ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# सुवर्णमध्य - भाग ५

दुसऱ्या दिवशी सकाळी उठले तर मॉनिकाचा घरासमोर मुव्हिंग व्हॅन (सामान हलवणारा ट्रक) उभी होती. मी धावत बाहेर गेले. मॉनिकाला शोधू लागले. "ह्या घरातल्या बाई मुलांना घेऊन पुढे निघून गेल्या. त्यांनी फक्त कपडे व भांडी न्यायला सांगितली. बाकीचं फर्निचर इथेच ठेवायचं. तुमचं नाव रीना का ? तुम्हाला त्यांनी हे पत्र दिलंय." सामान हलवणाऱ्या माणसांपैकीच एकानं पुढं येऊन मला सांगितलं. त्यांनी दिलेलं पत्र घेऊन मी भरल्या डोळ्यानं घरी परतले.

"प्रिय रीना," मॉनिकाने लिहिले होते, "तुझा निरोपही न घेता मी जाते आहे म्हणून रागावू नकोस. पण गेले दोन महिने टेडनं मला फार सतावलं आहे. त्याला बिझनेस सुरु करायचा आहे. मी त्याला पैसे द्यायचं ठरविलं आहे. त्याबद्दल त्यानं इथून गुपचूप निघून जायचं कबूल केलंय. तुमच्याशिवाय इतर कुणाला ही नवी घडलेली हकीकत ठाऊक नाही. माझं हे चिमुकलं विश्व अबाधित राहावं व माझी श्रीमंती ब्रूकफिल्डमध्येच गुप्त राहावी अशी माझी इच्छा आहे. चार-पाच वर्षांनी टेडची बिझनेसची हौस भागली तर कदाचित आम्ही कायमचे परत येऊ. मुलं आता श्रीमंतीत पडणार आहेत. आर्थिक सुस्थिती असतानाही मुलांना योग्य वळण लावून वाईट मार्गाकडे व प्रायोगिक जीवनमार्गाकडे ( Experimental Lifestyles ) न वळू देता वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे. मी मला यश लाभलं तर तुला कळवीनच.

"माझे इथले दिवस तू आल्यावर खूप आनंदात गेले. मी सुखात होते. तुझी मैत्री मी या जन्मात तरी विसरणार नाही.

"संजयला बिझनेससाठी पैसे हवे आहेत हे मला ठाऊक आहे. तो स्वतःच आज ना उद्या पैसे उभे करील. मला त्याला पैसे द्यायचे नाहीत कारण अशा सहज मिळालेल्या पैशावर चालू केलेला बिझनेस यशस्वी होत नाही. आमचे पैसे कुणाला लाभत नाहीत. उलट घातक ठरतात.

"तू माझ्यासाठी एकच काम कर. माझे घर सांभाळ. वाटल्यास भाड्याने दे. मोबदला म्हणून मी तुझ्या नावाने चेक तुझ्या अकौंटमध्ये परस्पर भरत जाईन. कधी ना कधी मी परत येऊन तुला भेटायचं वचन देते. पण तोपर्यंत तू माझा शोध लावायचा प्रयत्न करू नकोस.

- तुझी मॉनिका.

पत्राबरोबर पाकिटात तिच्या घराची किल्ली होती.

दिवस भराभर उलटू लागले. सुरवातीच्या अफवांनंतर शेजारी पाजारी मॉनिकाला विसरले. मी मात्र तिला विसरले नाही. तिच्या घराची निगा राखायचे काम मी इमानाने

करत राहिले. तिच्या गुलाबाच्या झाडांना खतपाणी देऊन फुलवत ठेवले. भाडेकरू मिळाल्याबरोबर तर घर भाड्याने दिले. भाडे तिच्या नावावर बँकेत भरत राहिले. दर महिन्याला घर राखण्याच्या कामाचा मोबदला म्हणून पैसे माझ्या खात्यावर आपोआप चेकने जमा होत होते.

मॉनिकाच्या जगावेगळ्या वागण्याचा आता मला उलगडा झाला होता.

तिने लग्नापूर्वी सर्व जग हिंडून पहिले होते. तिला आमच्या बर्म्युडा वगैरेच्या व्हेकेशनच्या प्रवासाचे काय कुतूहल?

आर्थिक काळजी आम्हा सामान्य माणसांमागे खरीखुरी होती. तिने कितीही आमच्यासारखे वागायचा वा काळजी वाटते असे दाखवायचा आव आणला तरी तिच्या दारात पैशाचे झाड असल्याने त्यातला खोटेपणा मला जाणवायचा. कुठलीही वस्तू फारच हवीशी झाली की सरळ विकत घेऊन येत असे, ते आम्हा इतरांना अशक्य होते.

दिवसांची वर्षे झाली. संजयने स्वतःचा बिझनेस लोन घेऊन काढला. चंदू व नंदू शाळा संपवून कॉलेजला गेले. आसपासची माणसे मॉनिकाचे घर माझेच आहे असे समजू लागली. सुरवातीला एकदोनदा कुणाला तरी टेड भेटला. ‘मोठा बिझनेस काढलाय’ म्हणून त्याने बढाया मारल्या अशी बातमी आली. नंतर काही वर्षांनी त्याला घटस्फोट मिळाल्याची बातमी आली.

आणखी काही वर्षे गेली. संजयने सुरु केलेला कॉम्प्यूटर सॉफ्टवेअरचा (Computer Softwear) बिझनेस अपेक्षेपलीकडे यशस्वी झाला. आपण हे घर विकून दुसरीकडे जास्त प्रेस्टिजेस सबर्बमध्ये राहायला जाऊ असं संजय म्हणू लागला. पण माझ्या मनाची तयारी नव्हती. कुठली तरी अनामिक ओढ मला मागे खेचत होती.

मी राहते घर मोठे केले व ब्रूकफिल्डमधून दुसरीकडे राहायला जायचा बेत पुढे ढकलत राहिले.

अजूनही मी मॉनिकाच्या घराची देखभाल करत होते. तिच्या गुलाबाच्या झाडांना पाणी घालताना मला मॉनिकाची मूर्ती दिसायची. संपत्तीवर लाथ मारणारी व्रतस्थ मॉनिका ! गर्भश्रीमंतीच्या कुटुंबाला दिलेल्या विनाशाच्या शापामुळे आपल्या आजोबांच्या वंशाचा ऱ्हास होऊ नये म्हणून जीवाचा आटापिटा करणारी मॉनिका ! कुठे होती ती? तिच्या धडपडीला यश आलं का? त्या शापातून तिच्या मुलांची मुक्तता झाली की नाही? हे प्रश्न सतत मला सतावत राहायचे. मॉनिका ही मी अर्धवट वाचलेली कादंबरी होती. तिचा शेवट मला अजून कळायचा होता. उत्तर काळाच्या हातात होते. मी वाट पाहत होते. आज ना उद्या मॉनिका मला वचन दिल्याप्रमाणे परतणार होती.

चंदू कॉलेज संपवून एका दुसऱ्या गावात आमच्या बिझनेसच्या शाखेचे काम चालवू लागला होता. त्याचे लग्नही झाले होते. त्याला दोन मुले झाली पाच आणि तीन वर्षाची मीना व नील लहानपणाच्या चंदू नंदू पेक्षा वेगळी होती. ते आगळेपण मला मधून मधून बोचत असे. ही कसली

चिन्हे होती? मी स्वतःला विचारायची. अतिश्रीमंतीचा मॉनिकाच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्यावर दुष्परिणाम होतो आहे अशी मला भीती वाटायची.

एके दिवशी सकाळी दारावरची बेल वाजली. मी दार उघडले तेव्हा दारात एक तरुण पुरुष उभा होता. सोनेरी केस, निळे डोळे, अगदी ओळखीचा वाटला. मला पाहताच त्याने भारतीय पद्धतीने वाकून नमस्कार केला. त्याला ही कुणाची तरी खास शिकवण दिसत होती.

"मी बॉब, मॉनिकाचा मोठा मुलगा." मी श्वास रोखून धरला. कादंबरीचा शेवट आता मला समजणार होता. शिवाय बॉबला पाहून मला खूप आनंद झाला, माझ्या चंदूसारखाच होता तो.

"बॉब, ये ये आत ये." मी त्याला घरात बोलावले.

"मॉनिका ठीक आहे ना ?" मी मनात उभ्या राहिलेल्या असंख्य प्रश्नांपैकी पहिला प्रश्न विचारला.

बॉब घोटाळल्यासारखा झाला, "आईने तुम्हाला हे पत्रं दिलंय." मी थरथरत्या हातानं बॉबने दिलेले पाकीट फोडले-

'प्रिय रीना,

आणखी सहा महिन्यांनी मी माझ्या ब्रूकफिल्डमधल्या घराकडे परतायचा विचार करते आहे. तू इतके दिवस घर सांभाळल्याबद्दल मी तुझी फार आभारी आहे. संजय बिझनेसमध्ये फार यशस्वी झाल्याचे मला ठाऊक आहे. त्याच्याविषयी मी बिझनेस वीक (मासिक) मध्ये वाचलं. माझ्या तर्फे त्याचं अभिनंदन कर. तू ब्रूकफिल्ड सोडून गेली नाहीस याचं आश्चर्य वाटतंय. माझी वाट पाहतेस का ?" मॉनिकाने माझ्या वर्मावरच बोट ठेवले होते.

"मी टेडला पैसे देण्याचं कबूल केलं होतं, पण एका अटीवर व ती म्हणजे आपण दुसरीकडं राहायला जाऊ. अशा रीतीने ब्रूकफिल्डला मध्यमवर्गीय म्हणून परतण्याचा मार्ग मी उघडा ठेवला होता.

टेडच्या इच्छेप्रमाणे आम्ही न्यूजर्सीला घर घेतलं. टेडचा बिझनेस माझ्या अपेक्षेप्रमाणे अयशस्वी झाला. त्याने एकदम फार उंच उडी घेतली. पाया न घालता घर बांधल्यासारखा होता त्याचा बिझनेस. अनुभवाचं खतपाणी नव्हतंच टेडकडे. त्यात घालायला तो माझ्याकडून आणखी पैसे मागत राहिला. आमची भांडणं होऊ लागली. मुलांना एव्हाना आमच्या श्रीमंतीचा शोध लागला. धाकटी दोघं माझ्या भावंडांच्या मार्गाने चालली आहेत. मोठा बॉब व त्याच्या खालचा बिल हे दोघे वेगळे आहेत, ब्रूकफिल्डमध्ये वाढल्यामुळे.

"अखेरीस मी टेडला घटस्फोट दिला. तो कुठं तरी फ्लॉरिडाला आहे. त्याला माझ्या इस्टेटीतून तनखा मिळतो. माझ्या आईकडं पाहून आपल्या कुटुंबापासून घटस्फोट घेतली तरी त्या माणसला तनखा मिळावा अशी आजोबांनी व्यवस्था केली होती.

"बॉब इस्टेट सांभाळायला आता समर्थ आहे. माझ्यानंतर तो मुख्य ट्रस्टी होईल. धाकटी दोघं रिटा व जॉन यांचा ब्रूकफिल्डमधून फार लहान वयातच न्यूजर्सीला टेडच्या आग्रहावरून घेतलेल्या महागड्या घरात व बरोबरच अमाप श्रीमंतीत प्रवेश झाला.

"गर्भश्रीमंतांना दिलेल्या शापाचे परिणाम त्यांच्यावर होऊ नयेत म्हणून मी महा प्रयत्न केले. पण मला यश आलं नाही, एवढचं लिहिते. त्यावरून काय ते तू समजशीलच. सबंध आयुष्य धडपडून आर्थिक सुस्थिती व मुलांची योग्य जोपासना ह्यांचा मेळ कसा घालायचा हे मला अजूनही कळलेलं नाही.

बाकी सर्व भेटीअंती.

-तुझी मॉनिका.

"मॉनिका कधी येतेय?" मी पत्र वाचून झाल्यावर घाईघाईने आणि उत्सुकतेने बॉबला विचारले.

"तीन महिन्यांपूर्वीच आईला अपघात झाला. त्यानंतर दोन आठवड्यांनी ती वारली. तिच्या मृत्यूपत्राबरोबर हे तुम्हाला लिहिलेलं पत्र सापडलं. जाण्यापूर्वी तिनं एक वचन माझ्याकडून घेतलंय." बॉब एक एक शब्द मोजून उच्चारात होता. मॉनिका वारली हे ऐकल्यावर त्याने उच्चारलेले शब्द माझ्या कानावर पडत होते, पण  मला समजत नव्हते. मी स्तब्ध बसून ऐकत राहिले.

"त्या वचनाप्रमाणे मला आता इथंच राहायचं आहे. नंतर एक चांगलीशी मुलगी शोधून मला लग्न करायचं आहे आणि मुलं सोळा-सतारा वर्षाची होईपर्यंत इथंच राहून इस्टेटीच्या पैशांची त्यांच्यावर सावलीही न पडू देता त्यांना वाढवायचं आहे. हे वचन मी पूर्ण पाळलं तरच माझ्या आईच्या व पणजोबांच्या आत्म्याला शांती लाभणार आहे. मी एक-दोन ठिकाणी नोकरीसाठी अर्ज केलेच आहेत." बॉब उठून उभा राहत म्हणाला.

मी मुकाट्याने उठून दाराजवळच्या खिळ्याल्या टांगलेली मॉनिकच्या घराची किल्ली त्याच्या हातात दिली. माझी जबाबदारी आता संपली होती.

दरवाज्यात उभी राहून मी मॉनिकाच्या घरातल्या बॉबच्या हालचाली पाहत होते. आपल्या वंशजांना गर्भश्रीमंतीच्या शापापासून वाचविण्यासाठी मॉनिकाने बॉबला हा खडतर मार्ग पत्करायला लावला होता. आपल्या रामाला तिने अक्षरशः वनवासात पाठवलं होतं.

नंतर मी तासभर घरात सुन्नपणे बसून होते. मॉनिका वारल्याचं मला दु:ख होतंच. शिवाय ती भेटल्यावर एका महत्वाच्या प्रश्नांचं उत्तर देईल अशी मला मोठी आशा होती.

त्या उत्तराची मला फार जरुरी होती, माझ्या नातवंडांसाठी व माझ्या वंशजांसाठी ! आज माझा पूर्ण अपेक्षाभंग झाला होता.

मॉनिकाला उत्तर सापडलंच नव्हतं. अमाप संपत्तीचा आणि संततीचा मेळ कसा घालायचा याचा मार्ग आता मला एकटीलाच शोधायचा होता. संपत्तीचे दुष्परिणाम आणि फायदे यांतला सुवर्णमध्य सापडवायचा होता.

(समाप्त)

पूर्वप्रसिद्धी : माहेर, ऑगस्ट १९८६
तारेवरची कसरत, विद्या प्रकाशन, जून १९८७